K. K. Wagh Education Society's

**K. K. Wagh College of Agriculture,**

(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)

Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra

**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

शब्दांना सत्याची धार

प्रहार

## खेडगांवात कृषीदूतांचे आगमन, ग्रा.पं.कडून स्वागत



◆ **खेडगांव (प्रतिनिधी) :**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत क.का. वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक येथील चतुर्थ वर्षाचे कृषीदूत संघर्ष पवार, रोशन सावंत, चिन्मय सदावर्ते, प्रतीक शेटे, प्रतीक प्रधान, यश शेवाळे, ऋषिकेश सरोदे यांचे ग्रामीण कृषि जागरूकता कार्यानुभव आणि कृषि औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रम २०२४-२५ च्या प्रायोगिक अनुभव आणि शिक्षणासाठी खेडगांव येथे आगमन झाले. कृषीदूत पुढील तीन महिने गावांत राहून तेथील सामाजिक, भौगोलिक, शेती विषयक बाबींवर सखोल अभ्यास करणार आहेत. शेतकऱ्यांना शेतीविषयक आधुनिक माहिती, तंत्रज्ञान, कीटकनाशकांचा समतोल वापर व त्यासाठी घ्यावयाची दक्षता, सेंद्रीय शेतीचे अद्ययावत ज्ञान, माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन, पशुपालन इ. बाबींची माहिती देणार असून प्रात्यक्षिकदेखील घेणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे आधुनिक ज्ञान प्रत्यक्षात उतरून शेतीविषयक अभ्यास करणे सोपे होणार आहे. आगमनावेळी खेडगावचे सरपंच दत्तात्रय पाटील, उपसरपंचशैलेश अशोक शेटे, ग्रामविकास अधिकारी आर. पी. पगार , ग्रामपंचायत सदस्य, लिपिक व ग्रामस्थ उपस्थित होते. विद्यार्थ्यांना क. का. वाघ कृषी महावद्यालयातील प्राचार्य डॉ. एस.एम. हाडोळे, कार्यक्रम समन्वयक प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. एस. डी. पटारे, प्रा. एस. डी. पवार व प्रा. के. डी. मोरे आणि सर्व कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयातील सर्व विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

Nashik Edition
Dec, 07 2024 Page No, 3
https://epaper.prahaar.in

देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
13 Dec 2024 - Page 9-Niphad

## शिरसगावला कृषिदूतांचे स्वागत



**पालखेड मिरचीचे ।** शिरसगाव ग्रामपंचायतीच्या वतीने के.के. वाघ कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहाने स्वागत करण्यात आले. गावातील विविध कृषी प्रकल्पांचा अभ्यास करण्यासाठी यश गंगाराम लडकत, शुभम दत्तात्रय महाले, सौरभ अधिक माळी, देव रोमेश मोगरे, आदित्य विवेक मोरे, ओम गुराप्पा मुडशी, प्रतीक गणपत पाबळे हे कृषिदूत शिरसगाव येथे तीन महिन्यांच्या अभ्यास दौऱ्यावर आले आहे. या कालावधीत ते शेतकऱ्यांना विविध कृषी विषयांवर मार्गदर्शन करतील. यामध्ये माती आणि पाणी परीक्षण, विविध पिकांच्या लागवडीचे तंत्रज्ञान, पिकांवरील रोग व किडींची ओळख आणि व्यवस्थापन, जनावरांची काळजी व संगोपन, बीजप्रक्रिया, तसेच सेंद्रिय शेतीचे तंत्रज्ञान यांचा समावेश आहे. स्वागत समारंभाला सरपंच रविंद्र रमेश शिरसाठ, उपसरपंच शंकर काशिनाथ भडांगे, ग्रामसेवक सोनाली सांगळे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा.के.एस. बंदी, संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ.के.एन. नांदूरकर, डॉ.एस.एस. साने, शकुंतलाताई वाघ, डॉ.व्ही.एस. माने, एस.जी. ठाकरे, डॉ.प्रीती भामरे व कॅम्पस समन्वयक डॉ.व्ही.एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, प्रा.परमेश्वरी पवार, डॉ.के.डी. मोरे, डॉ.एस.डी. पटारे, प्रा.एस.डी. पवार आदींसह महाविद्यालयातील सर्व विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## चिंचखेड ग्रामस्थांकडून कृषीदूतांचे स्वागत



✦**दिंडोरी।** तालुक्यातील चिंचखेड येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठाअंतर्गत क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे कृषीदूत प्रसाद ठाकरे, रितेश सोनवणे, ओम सूर्यवंशी, वेदांत तांबे, अभिजित तांबेरे, सुशांत विचवे, दर्शन वैद्य, नरेश वाडेकर यांचे ग्रामीण कृषी कार्यानुभव व कृषि औद्योगिक कार्यक्रम २०२४-२५ च्या अभ्यास दौऱ्यानिमित्त आगमन झाले. चिंचखेड ग्रामस्थांनी कृषीदूतांचे स्वागत केले.

या अभ्यास दौऱ्यादरम्यान कृषीदूत शेतकऱ्यांना शेतीविषयक शास्त्रीय माहिती, हंगामाप्रमाणे पीकपद्धती, रासायनिक खतांचा योग्य वापर, कीटकनाशके फवारताना घ्यावयाची काळजी कीटकनाशक व सेंद्रिय शेती याबद्दल माहिती देतील. अभ्यास कालावधी चार महिन्यांचा असून यादरम्यान माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन, पीक संरक्षण याबाबत प्रात्यक्षिक घेतले जातील. आगमनावेळी चिंचखेड गावचे सरपंच राधाबाई सताळे, उपसरपंच सुरेखा संधान, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी एन. एम. तांबे, लिपिक, इतर ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

Nashik Edition
Dec 10, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com

## ग्रामस्थांकडून कृषिदूतांचे स्वागत



**वडनेर भैरव :** महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत अरुण नागरे, प्रतीक भोसले, अनुज दवंगे, सौरभ नाईक, आकाश सूर्यवंशी, दर्शन झनकर, राहुल गायकवाड यांचे ग्रामीण कृषी कार्यानुभव व कृषी औद्योगिक कार्यक्रम २०२४-२५ च्या अभ्यास दौऱ्यानिमित्त वडनेर भैरव येथे आगमन झाले. वडनेर भैरव ग्रामस्थांनी कृषिदूतांचे स्वागत केले. या अभ्यास दौऱ्यादरम्यान कृषिदूत शेतक-यांना शेतीविषयक शास्त्रीय माहिती, हंगामाप्रमाणे पीक पद्धती, रासायनिक खतांचा योग्य वापर, कीटकनाशके फवारताना घ्यावयाची काळजी कीटकनाशके आणि सेंद्रिय शेती याबद्दल माहिती देतील. अभ्यास कालावधीत माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन, पीक संरक्षण याबाबत प्रात्यक्षिक घेतले जातील.

News published on Grampanchayat Extends Warm Welcome to RAWE Students in their village in daily newspaper

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture,**
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

अशोक पठाडे, माजी जिल्हाध्यक्ष विलास वडगे उपस्थित होते.



## शिरसगावला ग्रामीण कृषी जागरूकता

**कसबे सुकेणे :** शिरसगाव (ता. निफाड) येथे नाशिक कृषी विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव व औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रम नुकताच झाला. विद्यार्थी यश लडकत, शुभम महाले, सौरभ माळी, देव मोगरे, आदित्य मोरे, ओम मुडशी, प्रतीक पावळे यांनी सहभागी ग्रामीण मूल्यांकन आयोजित केले होते. त्याचा मुख्य उद्देश गावातील स्थानिक समस्यांचा सखोल अभ्यास करणे आणि त्यांच्या उपायांसाठी स्थानिक शेतकऱ्यांचे विचार व अपेक्षा समजून घेणे, हा होता. हा कार्यक्रम गावाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरला. विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम गावातील शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांची कृषिसंबंधित समस्या व अडचणी ऐकल्या. विद्यार्थ्यांनी या समस्यांवर ग्रामस्थांचे अनुभव व सूचना ऐकून पुढील अभ्यासाचा आराखडा तयार केला. या कार्यक्रमात विविध समुपदेशन पद्धतींचा वापर केला गेला. ज्यात गावाचा सामाजिक नकाशा, मुख्य पिकांचा नकाशा, दळणवळण नकाशा, शेतीसाठी वापरले जाणारे जलस्रोत, मातीचा नकाशा, तांत्रिक नकाशा, अशा विविध नकाशांचा समावेश होता. या प्रक्रियेद्वारे विद्यार्थ्यांनी गावातील पिके, तसेच जीवनमान यावर सुस्पष्ट माहिती मिळवली. विद्यार्थ्यांच्या या कार्यशाळेमुळे गावातील शेतकऱ्यांना त्यांच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी नवा दृष्टिकोन मिळाला. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेतकरी जीवनाशी संबंधित समस्या समजून घेण्याचा अनुभव मिळाला.

## शिरवाडे वणी मध्ये ग्रामीण मूल्यांकन

Posted By: गणतंत्र न्यूज on: January 21, 2025 In: ताज्या घडामोडी
No Comments Print Email




शिरवाडे वणी (प्रतिनिधी) के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थि कृषीदूत ओम वाघचौरे, आयुष बोद्रे, यश वाघ, मृणाल पाटील, रोहन कोळंबे, चेतन वाघ, प्रसाद राक्षे, अविष्कार जाधव यांनी ग्रामीण कृषी जागृकता आणि औद्योगिकता प्रशिक्षण कार्यक्रमअंतर्गत ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षणाचे आयोजन केले. ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षणात गावकऱ्यांच्या सहभागाने विविध मूल्यांकन आराखडे तयार केले. शेतकऱ्यांच्या सक्रिय सहभागाने गावाचा सामाजिक नकाशा,मुख्य पिकांचा नकाशा , दळणवळण नकाशा ,शेतीसाठी वापरले जाणारे जलस्त्रोत , अश्या विविध नकाशांचा वापर करुन विद्यार्थि गावातील विविध अडचणी जाणून घेतल्या. गावकऱ्यांसमवेत चर्चा करुन त्यांचे अभिप्राय घेण्यात आले. तसेच विद्यार्थिनीं गावाचा इतिहास, घडामोडी / घटना आणि चालू स्थितीबद्दल जाणून घेतले. यामध्ये त्यांनी कशाप्रकारे गावाचा विकास होईल याचेदेखील मार्गदर्शन केले. गावातील विविध संसाधने आणि सामाजिक संस्थांचे चित्रण करण्यासाठी विविध रंगांच्या रांगोळ्या वापरुन जमिनीवर सामाजिक संसाधन नकाशा तयार करण्यात आला. मॅपिंगमुळे गावकऱ्यांमध्ये रस निर्माण झाला. या सर्वेक्षणाद्वारे विद्यार्थ्यांनी ग्रामीण जीवनात, शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचा शेती व्यवसाय आणि संबंधित अडचणी जाणून घेतल्या. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी, अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतला वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस.जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे, डॉ. व्ही. एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, डॉ. के. डी मोरे,प्रा.एस.डी.पवार, डॉ.एस.डी.पटारे आदींचे मार्गदर्शन लाभले.

News published on Participatory Rural Appraisal (PRA) in daily newspaper

# चिंचखेड येथे कृषिदूतांनी रेखाटले गावाचे विविध नकाशे

**दिंडोरी (चिंचखेड) (भ्रमर वार्ताहर) :-** महात्मा फुले कृषी विद्यापीठाअंतर्गत क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे कृषिदूत प्रसाद ठाकरे, रितेश सोनवणे, ओम सूर्यवंशी, वेदांत तांबे, अभिजित तांबेरे, सुशांत विचवे, दर्शन वैद्य , नरेश वाडेकर यांचे ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषि औद्योगिक कार्यक्रम २०२४- २५ च्या अभ्यास दौऱ्या निमित्त चिंचखेड येथे आगमन झाले होते.

चिंचखेड येथे कृषिदूतांनी गावाचे विविध नकाशे जसे की सामाजिक, तांत्रिक , जल स्त्रोत, मृदा स्त्रोत, पीक व्यस्थापन, दळणवळण इत्यादी प्रकारचे नकाशे रेखाटले. यासाठी सर्व गावकऱ्यांकडून सर्वप्रथम सर्व माहिती घेतली. समस्त ग्रामस्थांनीही कृषिदूतांचे कौतुकही केले. हा उपक्रम राबवत असताना चिंचखेड गावच्या सरपंच राधाबाई सताळे, उपसरपंच सुरेखा संधान, सदस्य,



ग्रामपंचायत अधिकारी एन.एम. तांबे, लिपिक, इतर ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमात विद्यार्थ्यांना क. का. वाघ कृषी महावद्यालयातील प्राचार्य डॉ. एस.एम. हाडोळे, कार्यक्रम समन्वयक प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. एस. डी. पवार डॉ.के. डी. मोरे व डॉ. एस. डी. पटारे आणि सर्व कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयातील सर्व विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

# मुखेडमध्ये ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षण

लोकनामा प्रतिनिधी

**नाशिक :** मुखेड (ता. निफाड) येथे के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी आरती वाघचौरे, साक्षी ठाकरे, शिवानी विधाते, शिवानी यदुवंशी, संजीवनी मोहिते, साक्षी राऊत यांनी ग्रामीण कृषी जागरूकता आणि औद्योगिकता प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षण केले.

सर्वेक्षणात गावकऱ्यांच्या सहभागात विविध मूल्यांकन आराखडे तयार केलेत. शेतकऱ्यांच्या सक्रिय सहभागाने



गावाचा सामाजिक नकाशा, मुख्य पिकांचा नकाशा, दळणवळण नकाशा, शेतीसाठी वापरले जाणारे जलस्त्रोत अशा विविध नकाशांचा वापर करून विद्यार्थिनींनी गावातील विविध अडचणी जाणून घेतल्या. गावकऱ्यांसमवेत चर्चा करून त्यांचे अभिप्राय घेण्यात आले. तसेच विद्यार्थिनींनी गावाचा इतिहास, घडामोडी, घटना आणि चालू स्थितीबद्दल जाणून घेतले. यामध्ये त्यांनी कशाप्रकारे गावाचा विकास होईल, याबाबतदेखील मार्गदर्शन केले. गावातील विविध संसाधने आणि सामाजिक संस्थांचे चित्रण करण्यासाठी विविध रंगांच्या रांगोळ्या वापरून जमिनीवर सामाजिक संसाधन नकाशा तयार करण्यात आला. मॅपिंगमुळे गावकऱ्यांमध्ये रस निर्माण झाला.

या सर्वेक्षणाद्वारे विद्यार्थ्यांनी ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचा शेती व्यवसाय आणि संबंधित अडचणी जाणून घेतल्या. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी, अशोक मर्चेंट, चांगदेवराव होळकर, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतलाताई वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस. जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे, डॉ. व्ही. एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, डॉ. के. डी. मोरे, प्रा. एस. डी. पवार, डॉ. एस. डी. पटारे आदींचे मार्गदर्शन लाभले.

News published on Participatory Rural Appraisal (PRA) in daily newspaper

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture,**
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

**भ्रमर**
Bhramar Reporter Dec 23, 2024

# चिंचखेड ग्रामस्थांना कृषीदूतांकडून तणनाशक फवारणीचे धडे



दिंडोरी ( चिंचखेड )- महात्मा फुले कृषी विद्यापीठाअंतर्गत क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे कृषिदुत :- प्रसाद ठाकरे, रितेश सोनवणे, ओम सुर्यवंशी, वेदांत तांबे, अभिजित तांबेरे, सुशांत विचवे, दर्शन वैद्य , नरेश वाडेकर यांचे ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषि औद्योगिक कार्यक्रम २०२४- २५ च्या अभ्यास दौऱ्या निमित्त चिंचखेड येथे आगमन झाले. चिंचखेड ग्रामस्थांनी कृषीदूतांचे स्वागत केले. या अभ्यास दौऱ्या दरम्यान कृषिदूत शेतक-यांना शेतीविषयक शास्त्रीय माहिती, हंगामा प्रमाणे पीक पद्धती, रासायनिक खतांचा योग्य वापर, कीटकनाशके फवारताना घ्यावयाची काळजी कीटकनाशक आणि सेंद्रिय शेती याबद्दल माहिती देताय.

या उपक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना कांदा पिका मध्ये 'गोल' तणनाशक फवारणीची वैज्ञानिक पद्धत समजवली व त्याचे परिणाम ही दाखविले. शेतकरी वापरात असलेली पद्धत आणि विद्यार्थ्यांनी दाखवलेली पद्धत यांच्यातल्या परिणामाचा फरक पाहून शेतकऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुकही केले.

या अभ्यास दौऱ्यास विद्यार्थ्यांना क. का. वाघ कृषी महावद्यालयातील प्राचार्य डॉ. एस.एम.हाडोळे कार्यक्रम समन्वयक प्रा. परमेश्वरी पवार , डॉ. एस.डी.पटारे प्रा.एस.डी.पवार व डॉ. के.डी.मोरे आणि सर्व कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयातील सर्व विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभत आहे.

News published on demonstration on Herbicide Spraying Techniques for Effective Weed Management in Chinchkhed in daily newspaper

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture**,
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
College Code;11135 AISHE Code: C-50690
.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

## वणी येथे के. के. वाघ कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे दिले धडे.

Posted By: गणतंत्र न्यूज़ on: January 30, 2025 In: ताज्या घडामोडी
No Comments Print Email




वणी (प्रतिनिधी ) शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे धडे शिरवाडे वणी येथे राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्न के. के. वाघ कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थि शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे धडे दिले.के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील अंतिम वर्षाचे विद्यार्थि कृषीदूत ओम वाघचौरे, आयुष बोद्रे, यश वाघ, मृणाल पाटील, रोहन कोळंबे, चेतन वाघ, प्रसाद राक्षे, अविष्कार जाधव हे अभ्यासाचा भाग म्हणून ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव, औद्योगिक कार्यक्रमांतर्गत येथील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत आहे. यांचा या उपक्रमात सहभाग आहे. त्यांनी शेतकऱ्यांची भेट घेत आपल्या काम ाबद्दल माहिती दिली. विद्यार्थिनीं शेतात ग्रामस्थांना बोलावून माती परीक्षण प्रात्याक्षिकाचे आयोजन करत महत्त्व पटवून दिले. शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे विद्यार्थिनीं निवारण केले.कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. समीर वाघ, संचालक मा. श्री. अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी, सचिव अशोक मर्चंट, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, डॉ. व्ही. एस. माने, डॉ. प्रीती भामरे, डॉ. व्हि. एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, डॉ. के. डी. मोरे, डॉ. एस. डी. पटारे, प्रा. एस. डी. पवार व महाविद्यालयातील इतर तज्ज्ञांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

Jan 9 , 2024

नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक
भ्रमर
BHRAMAR

K L THAKUR AND SONS SARAF
Gold | Silver | Diamond
ॲडव्हान्स फिजिओ केअर



## शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे धडे

**दिंडोरी (भ्रमर वार्ताहर) :-** चिंचखेड येथे राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्न के. के. वाघ कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे धडे दिले.

अभ्यासाचा भाग म्हणून ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव, औद्योगिक कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी चिंचखेड येथील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कृषीदूत प्रसाद ठाकरे, रितेश सोनवणे, ओम् सूर्यवंशी, वेदांत तांबे, अभिजित तांबेरे, सुशांत विचवे, दर्शन वैद्य व नरेश वाडेकर हे या उपक्रमात सहभागी झाले होते. त्यांनी शेतकऱ्यांची भेट घेत आपल्या कामाबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम संजय थोरात यांच्या शेतात ग्रामस्थांना बोलावून माती परीक्षण प्रात्यक्षिकाचे आयोजन करीत महत्त्व पटवून दिले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे फायदेही समजावून सांगितले.

या परीक्षणामुळे शेतकऱ्यांना आपल्या जमिनीमध्ये कुठल्या घटकांची कमी आहे ते समजेल व त्यावरून ते योग्य खतांचा योग्य प्रमाणात वापर करू शकतील. शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची विद्यार्थ्यांनी उत्तरे दिली. शेतकऱ्यांनी कृषीदूतांचे कौतुकही केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांना क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, उपप्राचार्या पुष्पांजली शिंदे, कार्यक्रम समन्वयक प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. एस. डी. पटारे, प्रा. एस. डी. पवार व प्रा. के. डी. मोरे आणि सर्व कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयातील सर्व विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

News published on Soil Testing in daily newspaper

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture**,
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

## उंबरखेड गावा मध्ये क. का. वाघ कॉलेजच्या विद्यार्थीनींनी तयार केला ५% NSKE

Posted By: गणतंत्र न्यूज on: December 27, 2024
In: ताज्या घडामोडी No Comments Print Email




*उंबरखेड* : क. का. वाघ कॉलेज, नाशिक येथील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थीनी मिताली मुथा, अर्पिता मकासरे, नंदिनी नवसारे, अस्मिता कुनगर, इशिका कोळी, अदिती मोराणकर यांनी उंबरखेड गावात शेतकऱ्यांसाठी NSKE च्या ५% मिश्रण तयार केले. या पेस्टिसाईडचा वापर नैसर्गिक कीटक नियंत्रणासाठी केला जातो, जो पर्यावरणासाठी हानिकारक नाही आणि शेतकऱ्यांना रासायनिक कीटकनाशकांच्या वापरापासून दूर ठेवतो.

News published on preparation of NSKE 5% by in daily newspaper

## क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी उंबरखेड गावात परसातील कुक्कुटपालन कार्यशाळेचे आयोजन

Posted By: गणतंत्र न्यूज on: December 24, 2024
In: ताज्या घडामोडी No Comments Print Email




उंबरखेड (ता. निफाड) : क. का. वाघ कृषी महाविद्यालयातील विद्यार्थीनी मिताली मुथा, अर्पिता मकासरे, नंदिनी नवसारे, अस्मिता कुनगर, इशिका कोळी, अदिती मोराणकर यांनी उंबरखेड गावात "बॅकयार्ड पोल्ट्री" अर्थात परसातील कुक्कुटपालनाचे प्रात्यक्षिक आयोजित केले. या कार्यशाळेत स्थानिक शेतकऱ्यांना कुक्कुटपालनाची महत्त्वाची माहिती आणि तंत्रज्ञान दिले गेले.

क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी नेहमीच शेतकऱ्यांसाठी नवनवीन का[illegible] आणि प्रात्यक्षिका घेऊन येतात. या वेळी, शेतकऱ्यांना कुक्कुटपालनाच्या फायदे आणि त्याचे व्यवस्थित व्यवस्थापन याबद्दल

News published on demonstration on Backyard Poultry in the Village

BREAKING NEWS स्पर्धेत आदर्श इंग्लिश मिडीयम स्कूलचे यश मानसी माळी [ नहीरे ] गोल 11:01:44

HOME » ताज्या घडामोडी » मुखेड गावातील शेतकऱ्यांना मशरूम उत्पादनाबद्दल के.के. वाघ महाविद्यालयाच्या कृषि कन्यांकडुन मार्गदर्शन

## मुखेड गावातील शेतकऱ्यांना मशरूम उत्पादनाबद्दल के.के. वाघ महाविद्यालयाच्या कृषि कन्यांकडुन मार्गदर्शन

Posted By: गणतंत्र न्यूज on: December 28, 2024 In: ताज्या घडामोडी No Comments Print Email



मुखेड (दि. 26 डिसेंबर 2024) – के.के. वाघ कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आरती वाघचौरे, साक्षी ठाकरे, शिवानी विधाते, शिवानी यदुवंशी, संजीवनी मोहिते, साक्षी राऊत यांनी आज ग्रामीण कृषि जागरूकता कार्यानुभव आणि कृषि औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत मुखेड गावातील शेतकऱ्यांना मशरूम उत्पादनाबद्दल महत्त्वपूर्ण माहिती दिली. विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना मशरूम उत्पादनाच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन करत, त्याच्या लागवडीपासून ते विक्रीपर्यंत सर्व प्रक्रियेचा थोडक्यात आढावा घेतला.

शेतकऱ्यांना मशरूम लागवडीची सोपी पद्धती, त्यासाठी लागणारे योग्य वातावरण, तसेच यासाठी लागणारे संसाधनांबद्दल माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी मशरूमच्या उत्पादनाचे आर्थिक फायदे आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीच्या संदर्भात माहिती दिली, ज्यामुळे शेतकऱ्यांना या क्षेत्रात येणाऱ्या संधींचा फायदा घेता येईल.

के.के. वाघ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना सल्ला दिला की, मशरूम उत्पादनावर लक्ष देऊन ते आपल्या शेतीला नवा वळण देऊ शकतात.

कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा.के. एस. बंदी, संस्थेचे विश्वस्त अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ. के.एन. नांदूरकर, डॉ. एस.एस. साने, शकुंतलाताई वाघ, डॉ. व्ही.एस. माने, एस.जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे व कॅम्पस समन्वयक डॉ. व्ही.एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, डॉ. के. डी मोरे, प्रा.एस.डी.पवार, डॉ.एस.डी.पटारे , डॉ.एच.व्ही.देशमुख व महाविद्यालयातील सर्व विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

**कृपया बातमी जास्तीत जास्त शेयर करा.**

News published on demonstration of Mushroom Production: in daily newspaper

Dec 15, 2024

नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक
भ्रमर
BHRAMAR

K L THAKUR AND SONS SARAF
Gold | Silver | Diamond

## कृषीदूतांनी केली शेतकऱ्यांना मदत

**दिंडोरी (भ्रमर वार्ताहर) :-** महात्मा फुले कृषी विद्यापीठाअंतर्गत क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे कृषीदूत प्रसाद ठाकरे, रितेश सोनवणे, ओम् सूर्यवंशी, वेदांत तांबे, अभिजित तांबेरे, सुशांत विचवे, दर्शन वैद्य व नरेश वाडेकर यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव व कृषी औद्योगिक कार्यक्रम अभ्यास दौऱ्यानिमित्त चिंचखेड येथे भेट दिली.

या निमित्ताने कृषीदूतांनी गावातील शेतकऱ्यास पीक कर्ज घेण्यास मदत केली. या उपक्रमात विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी, अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतला वाघ, डॉ. व्ही. एस. माने, क. का. वाघ कृषी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, कार्यक्रम समन्वयक प्रा. परमेश्वरी पवार, प्रा. एस. डी. पवार, प्रा. के. डी. मोरे, डॉ. एस. डी. पटारे आदी उपस्थित होते.




News published on Preparation of Bank Loan Proposal in daily newspaper

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture,**
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
**College Code;11135** **AISHE Code: C-50690**
.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

दिव्य मराठी
नाशिक' जिल्हा पुलआउट
04-01-2025

# 'कृषी'च्या विद्यार्थिनींकडून जनावरे लसीकरण शिबिर



शिरसगाव येथे जनावरे लसीकरणप्रसंगी कृषीकन्या व शेतकरी.

कसबे सुकेणे | शिरसगाव येथे के. के. वाघ कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी पाय व तोंड रोग आणि लंपी यासारख्या आजारांपासून जनावरांचे संरक्षण करण्यासाठी लसीकरण शिबिर आयोजित केले. शिबिराचे आयोजन कृषिकन्या हर्षाली पावरा, अपेक्षा नेरकर, स्नेहल पाटील, सृष्टी पवार, श्रावणी पोखरकर, प्रियंका सातपुते व कृतिका शेवाळे यांनी केले होते..

या उपक्रमात पशुवैद्यकीय विभागाच्या सहकार्याने शेतकऱ्यांच्या जनावरांना मोफत लसीकरण करण्यात आले. शेतकऱ्यांना जनावरांच्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालक अजिंक्य वाघ, प्रा. कल्लापा बंदी, सचिव अशोक मर्चंट, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर व महाविद्यालयातील इतर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले.

नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक
किंमत २
भ्रमर
BHRAMAR
E-ma
नाशिक, शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५
Nashik, Friday 24 January 2025
R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026

# के. के वाघ कृषी महाविद्यालयात जनावरांच्या लसीकरण शिबिर



**दिंडोरी (भ्रमर वार्ताहर)** :- चिंचखेड येथे के. के. वाघ कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पाय व तोंड रोग आणि लंपी यासारख्या आजारांपासून जनावरांचे संरक्षण करण्यासाठी लसीकरण शिबिर आयोजित केले. शिबिराचे आयोजन कृषीदूत प्रसाद ठाकरे, रितेश सोनवणे, ओम् सूर्यवंशी, अभिजित तांबरे, वेदांत तांबे, दर्शन वैद्य, सुशांत विचवे व नरेश वाडेकर यांनी केले होते.

या उपक्रमात पशुवैद्यकीय विभागाच्या सहकार्याने शेतकऱ्यांच्या जनावरांना मोफत लसीकरण करण्यात आले. जनावरांच्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत जागरुकता निर्माण झाली. या उपक्रमात विद्यार्थ्यांना क. का. वाघ कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, उपप्राचार्या पुष्पांजली शिंदे, प्रा. ए. सी. जाधव, कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. परमेश्वरी पवार, डॉ. एस. डी. पटारे, प्रा. एस. डी. पवार व प्रा. के. डी. मोरे, कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयातील सर्व विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

News published on Livestock Vaccination Drive, Ensuring Animal Health and Welfare in daily newspaper

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture,**
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

## मुखेड येथे प्रजासत्ताक दिन साजरा , कृषिकन्यांचा उत्स्फूर्त सहभाग .

Posted By: गणतंत्र न्यूज on: January 26, 2025 In: ताज्या घडामोडी No Comments Print Email



मुखेड ( प्रतिनिधी) 26 जानेवारी 2025 रोजी, प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा झाला . मुखेड येथे देखील प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला . के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी , कृषिकन्या आरती वाघचौरे, साक्षी ठाकरे, शिवानी विधाते, शिवानी यदुवंशी, संजीवनी मोहिते, साक्षी राऊत यांनी जिल्हा परिषद शाळा मुखेड येथील विद्यार्थी आणि गावकऱ्यांसोबत प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. विद्यार्थ्यांनी व गावकऱ्यांनी एकत्र येऊन मुखेड ग्रामपंचायत येथे सर्वांना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगण्यात आले .सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्ती चे पूजन करण्यात आले तदनंतर ध्वजारोहण केले , राष्ट्रगीत आणि ध्वजगीत गायन करून सर्वांनी राष्ट्रीय ध्वजाचा सन्मान केला . यानंतर जिल्हा परिषद शाळेमध्ये देखील सरपंच अमोल जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले . याप्रसंगी मुखेड ग्रामपंचायतीच्या वतीने विद्यार्थ्यांना प्रोजेक्टर भेट करण्यात आले . शाळेचे मुख्याध्यपक मा. संदीप बैरागी यांनी सर्वांचे आभार मानले .
तसेच, कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शेतकरी जीवनाशी संबंधित आणि प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व दर्शविणारे विविध घोषवाक्य चे चार्ट बनविले. या कार्यक्रमामुळे शालेय विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व समजले,देशाबद्दल आत्मीयता निर्माण होण्यास मदत झाली.तसेच गावकऱ्यांमध्ये एकता व सहकार्याची भावना निर्माण झाली.
या कार्यक्रमासाठी मुखेड गावाचे सरपंच मा.अमोल जाधव उपसरपंच सौ.वृषाली पवार ग्ग्रामपंचायत अधिकारी कमलेश सावंत ग्रामपंचायत सदस्य पंकज पवार,लीलाबाई पाटील,जयश्री नेहरे,अनिता गांगुर्डे इ.व ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील अंतिम वर्षातील विद्यार्थिनीं जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत "76 वा प्रजासत्ताक दिन" साजरा केला.

Posted By: गणतंत्र न्यूज on: January 26, 2025 In: ताज्या घडामोडी
No Comments Print Email




के. के. वाघ कृषी महाविद्यालयातील अंतिम वर्षाचे विद्यार्थि कृषीदूत ओम वाघचौरे, आयुष बोद्रे, यश वाघ, मृणाल पाटील, रोहन कोळंबे, चेतन वाघ, प्रसाद राक्षे, अविष्कार जाधव यांनी 26 जानेवारी रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत "76 वा प्रजासत्ताक दिन" साजरा केला. यात विद्यार्थ्यांसमवेत प्रभातफेरीमध्ये सहभागी होऊन कृषिदूतानी देशभक्तिपर नारे देत राष्ट्रभक्तिविषयी जनजागृती केली. तसेच वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पाडला. याबद्दल सर्व शिक्षकांनी व ग्रामस्थानी कृषिदूतांचे कौतुक केले.

कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी, अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतला वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस.जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे, डॉ. व्ही. एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, डॉ. के. डी मोरे,प्रा.एस.डी.पवार, डॉ.एस.डी.पटारे आदींचे मार्गदर्शन लाभले

News published on 76th Republic Day with Enthusiasm in daily newspaper

K. K. Wagh Education Society's
**K. K. Wagh College of Agriculture,**
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri)
Saraswati Nagar, Panchavati, Nashik- 422 003. Maharashtra
**College Code;11135** **AISHE Code: C-50690**

☎.:(0253)2555221, 2555224 - principal-bscagri@kkwagh.edu.in https://agri-bsc.kkwagh.edu.in

## उंबरखेड प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा; विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन

Posted By: गणतंत्र न्यूज on: January 26, 2025 In: ताज्या घडामोडी No Comments




उंबरखेड, 26 जानेवारी: उंबरखेड येथील प्राथमिक शाळेत आज 76 वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापकांच्या हस्ते ध्वजवंदनाने झाली. विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत गाऊन देशभक्तीपर अभिवादन केले.

यावेळी शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गाणी, नृत्ये आणि भाषणे सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. शाळेच्या शिक्षकांनीही आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. शाळेत क.का.वाघ कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते.या स्पर्धेत विविध गटांतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. "माझे स्वप्नातील भारत" या विषयावर विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला रंग दिले.विजेत्यांना शाळेच्या वतीने प्रमाणपत्रे व बक्षिसे देऊन गौरवण्यात आले.

उंबरखेड गावातील ग्रामस्थ व पालकांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थिती लावून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अशा प्रकारे प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम आनंदमय वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी, अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, शकुंतला वाघ, डॉ. व्ही. एस. माने, एस.जी. ठाकरे, डॉ. प्रीती भामरे, डॉ. व्ही. एम. सेवलीकर, प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, प्रा. परमेश्वरी पवार, डॉ. के. डी. मोरे, प्रा.एस.डी.पवार, डॉ.एस.डी.पटारे आदींचे मार्गदर्शन लाभले.

शिल्पकार विकासाचा...
# देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
28 Jan 2025 - Page 5-Niphad

## कृषिकन्यांकडून प्रभातफेरी



**पालखेड मिरचीचे।** कोकणगावला के.के. वाघ कृषी महाविद्यालयातील अंतिम वर्षातील विद्यार्थिनी कृषिकन्या हर्षाली पावरा, अपेक्षा नेरकर, स्नेहल पाटील, सृष्टी पवार, श्रावणी पोखरकर, प्रियांका सातपुते व कृतिका शेवाळे यांनी २६ जानेवारी रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा केला. यात विद्यार्थ्यांसमवेत प्रभातफेरीमध्ये सहभागी होऊन कृषिकन्यांनी देशभक्तिपर नारे देत राष्ट्रभक्तिविषयी जनजागृती केली. शालेय विद्यार्थ्यांसाठी स्वातंत्र्य सैनिकांची वेशभूषा स्पर्धा आयोजित करुन त्यांच्या कार्याच्या आठवणीला उजाळा दिला. तसेच, स्वातंत्र्य लढ्यातील त्यांनी दिलेले योगदान विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. याबद्दल शिक्षकांनी कृषिकन्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.एस.एम. हाडोळे, प्रा.परमेश्वरी पवार, डॉ.के.डी. मोरे, डॉ.एस.डी. पटारे, प्रा.एस.डी. पवार आदींसह महाविद्यालयातील इतर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

News published on 76th Republic Day with Enthusiasm in daily newspaper